# मी विठ्ठल पाहिला?

## वारी अनुभव - लेख क्र. 18

**- राजश्री कुलकर्णी** (साऊथ ब्रुन्सविक, न्यु जर्सी)

पंढरपूरला पोहोचायला आता फक्त दोन दिवस बाकी होते.

**वेळापूर-भंडीशेगाव २० किलोमीटर**

**रविवार: जुलै ६, २०१४**

'वारी'चा 'पायी प्रवास' सुरू होऊन बरेच दिवस झाले, परंतु काल पहिल्यांदाच रात्री सार्वजनिक शाळेत रहावं लागलं. लहानपणी, नागपूरला, गच्चीत झोपायचो तसे झोपलो. ती मजा काही वेगळीच होती. सकाळी आडोश्याला साडी बांधून आंघोळ केली. ही पण 'मजा' काही 'और'च म्हणावी लागेल!

चहा घेऊन, सकाळी पाच वाजता चालायला सुरुवात केली. तीव्र उन्हामुळे, दिंडीसोबत न चालण्याचा आम्ही निर्णय घेतला. ८.३० वाजता जेवणाच्या विसाव्याला थांबलो. स्वयंपाकी आणि 'सेवा करणारे वारकरी' तिथे सामानाच्या ट्रकने आम्ही येण्यापूर्वीच पोहोचले होते. दिंडीतील वारकऱ्यांसाठी जेवणाची तयारी सुरू झाली होती. पुरी-भाजी-लाडूचा बेत होता. पण जेवणासाठी आम्ही थांबलो नाही. दुपारच्या भाजून काढणाऱ्या उन्हाचे चटके कमीत कमी लागावे आणि मुक्कामाच्या ठिकाणी लवकरात लवकर पोहोचावे, अशी सगळ्यांची इच्छा होती.




थोडा विसावा घेऊन १०.३० वाजता पुढे चालायला सुरुवात केली. वाटेत जाताना रस्त्यावर बायका गरम भाकरी आणि पिठलं करीत होत्या. 'हेच आपलं दुपारचं जेवण', तत्काळ मनात विचार आला; अर्थात यावर कोणाचंच दूमत नव्हतं.

दुपारी दोनच्या सुमारास 'भंडीशेगाव'ला एका शाळेत, श्रीनाथ विद्यालयात, मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचलो. दिंडीतील इतर वारकरी पोहोचायला अजून वेळ होता. वारकरी 'शालिनी जोगळेकरां'नी पायाचे pressure-points दाबून दिले. त्यांचा त्याबद्दलचा अभ्यास झाला होता. पाय साहजिकच खूप दुखत होते. पण बाकी त्रास काहीच नव्हता. 'पंढरपूरला मी हसत-खेळत, नाचत-बागडत पोहोचू दे' ही माझी तीव्र इच्छा पूर्ण होणार, अशी शक्यता वाटायला लागली. मात्र, माझ्या मैत्रिणीला (आणि आशाताईंना देखील) खूप त्रास व्हायला लागला. चित्राला तर पायांना ब्लिस्टर्स/फोड आले होते. तिची प्रबळ इच्छाशक्ती कमी पडते आहे, असं तिला वाटायला लागलं.

भंडीशेगाव, हे अगदी छोटंसं गाव! महाराष्ट्राच्या नकाशावर कधी बघितल्याचंदेखील आठवत नाही. अशा या गावात वारीचा शेवटच्या दिवशीचा मुक्काम.

उद्या पंढरपूर! वारीचा शेवटचा दिवस म्हणून मिश्र भावना येत होत्या. काही लोकांशी वेगळंच नातं जडलं होतं. ते कदाचित परत कधीच भेटणार नव्हते.

आता संध्याकाळचा चहा होईपर्यंत वेळ होता. त्या रात्री राहण्यासाठी, दिंडीतल्या बायकांना, शाळेतील तळमजल्यावरील दोन/तीन वेगळ्या खोल्या मिळाल्या. त्यातल्याच एका खोलीत सामान ठेवलं आणि चौफेर नजर फिरवली. माझं लक्ष भिंतीवरच्या फळ्याकडे गेलं. त्यावर खालील शब्द लिहिले होते-




तसेही भारतात सारखे सण होतच असतात. दिवाळी-दसरा या सणांशिवाय, रामनवमी, महावीरजयंती, शिवजयंती, महाशिवरात्री, इत्यादींनिमित्त शाळांना सुट्ट्या असतातच. त्यात अजून आषाढीवारी निमित्त 'चार' दिवस सुट्टी? हे कितपत योग्य होतं? मी वारीच्या मार्गावरील अनेक गावात तेथील बऱ्याच लोकांशी बोलले. पण कोणीही वारीतील लोकांबद्दल तक्रार करताना दिसलं नाही. उलट वारकऱ्यांना मदत करण्याची त्यांची इच्छा असायची. शिवाय इतके वारकरी राहायला येणार म्हणजे थोडीफार गैरसोय होणारच, हीदेखील त्यांच्या मनाची तयारी होती.

संध्याकाळी चहा होईपर्यंत बराच वेळ होता. मोठ्या वाहतुकीमुळे खाण्याचा ट्रक यायला खूप वेळ लागला. काही लोकांशी गप्पा मारल्या. देव जर सगळीकडेच आहे, तर पंढरपूरला कशाला जायचं? एका छोट्या समूहामध्ये चर्चा सुरू होती. **'विठोबा स्वयंभू आहे'. काही 'स्थानांचं' महत्व असतं,** म्हणून पंढरपूरला जायचं.

रात्री अमेरिकेत राजेशशी बोलणं झालं, दुपारी पपांशी (सासऱ्यांशी), भाऊ-वहिनी, बहीण... सगळ्यांशी बोलणं झालं. आता सगळे माझ्या परतीची आतुरतेने वाट बघत होते. इतके दिवसात काय घडलं, माझा प्रवास कसा झाला, हे सगळं ऐकण्याची त्यांना खूप उत्सुकता होती.

रात्री विठोबाकाका आणि योगेश, किरण, अक्षय, अमोल या मुलांशी बोलणं झालं. इतरही बऱ्याच वारकऱ्यांशी निरोपाचं बोलणं झालं. परत कधी भेटणार, याची शाश्वती नव्हती. मग फोन नंबर्स आणि राहत्या पत्याची देव-घेव झाली. रात्री साडेनऊला जेवणं झाली. पोळी, भोपळी मिरचीची भाजी, वरण, भात, ताक... असा बेत होता. नेहमीसारखंच मस्त जेवण होतं, पण जेवायची इच्छा नव्हती. मात्र, त्या रात्रीच्या पंगतीत मला वाढायची संधी मिळाली. त्यादिवशीदेखील मुक्कामाच्या ठिकाणी दिंडीसोबतच झोपले. रात्री परत एकदा भरपूर पाऊस झाला. इतका की, आम्ही झोपलो त्या खोलीत पाणी आलं.

आज वारीमधला शेवटचा दिवस होता. खरंच उद्या मी पंढरपूरला पोहोचणार? रात्री बराच वेळ झोप आली नाही. परत एकदा विचारांनी मनात गर्दी केली. वारीच्या या प्रवासात काय काय शिकायला मिळालं?

- वारी मधून चालताना आपण सामान्यातले सामान्य होऊन जातो. जात-पात, उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष असा कुठलाही भेदभाव न मानता लाखो लोक भगवंताच्या दर्शनाच्या एकाच ओढीने एकाच दिशेला एक जुटीने प्रवास करतात.
- मी कुठेही भांडण झालेलं पाहिलं नाही. 'माऊली' हा शब्द सांकेतिक शब्दासारखा वापरू शकत होते. समोर जाण्यासाठी समोर जाण्यासाठी फक्त 'माऊली' म्हटलं, की ते समोरचे वारकरी बाजूला सरकून तुम्हाला पुढे जाण्यासाठी वाट करून द्यायचे.
- रोजचं जीवन जगताना कित्येक गोष्टी आपण गृहीत धरतो, त्याचं महत्व कळलं. उदा. पाणी, वीज, सावली, चांगली तब्येत! या सगळ्या गोष्टींचं महत्व परत एकदा अनुभवलं.
- मात्र या सर्व प्रवासात मला सगळ्यात जास्त भावली, ती माणसांची माणुसकी. कित्येकांच्या रूपाने माऊली मला भेटली; किती उदाहरणं देऊ? त्या लोकांबद्दल मला काय वाटतं, ते फक्त मलाच माहिती आहे. प्रत्येक भावना शब्दात मांडू शकत नाही. 'देशमुख दिंडी' मधल्या अर्ध्यापेक्षा जास्त लोकांशी एक वेगळंच नातं जुळलं. काही गोष्टी, माणसं हृदयावर कोरली गेली.
- लाखो लोकांचा तो सहवास, एकत्र चालणं, दररोजची भारून टाकणारी समाजआरती, हरिपाठ, गोल आणि उभी रिंगणं, धावा, भारूडं, प्रवचनं, भजनं, हे खूप काही शिकवून गेलं.

प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी हा प्रवास करावा. या सगळ्या अनुभवांतून आपण घडत असतो. आपला जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. आयुष्यभर आठवणीत राहील, अशा या वारीत माझा एक अवगुण जरी कमी झाला, तरी ही वारी सफल झाली, असं म्हणायला हरकत नाही. **(क्रमशः)**